सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक १६३(२)/२०१९/१४-ब** **दिनांक २२ जुलै,२०२१**

# -:प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:- महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ निकाल प्रक्रियेबाबत.**

**संदर्भ:- जाहिरात क्र. ०४/२०१९ व अधिसूचना क्र. १२/२०१९.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत रविवार दिनांक १५ सप्टेंबर, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या लेखी परिक्षेचा निकाल दिनांक ३० जानेवारी, २०२० रोजी जाहीर करण्यात येऊन मुलाखतप्रक्रीया देखील पार पडली आहे. दरम्यान, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्याय निर्णयानुसार सदर प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आले आहे. सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २०२०/प्र. क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रीया राबविण्यासंदर्भात शासनाकडून कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गाकरिता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रूपांतरीत करून विषयांकित परीक्षेचा सुधारित निकाल दिनांक २२ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सुधारित निकालानुसार मुलाखतीकरीता नव्याने पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येईल.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी अर्जामध्ये केलेल्या विविध दाव्यांच्या आधारे पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून मुख्य परीक्षेच्या निकाला आधारे मुलाखतीकरीता पात्र ठरविण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

३. मुख्य परीक्षेच्या सुधारीत निकालान्वये मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेकरीता अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या नमुन्यात (Format) आयोगास ऑनलाईन पध्दतीने Link Open झाल्याच्या दिनांकापासून आठ दिवसांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

४. अंतिम निवडीकरिता विचार होण्यासाठी उमेदवाराने विहित पद्धतीने पसंतीक्रम सादर करणे अनिवार्य राहील.

५. प्रस्तुत परीक्षेचा सुधारित निकाल विविध न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. दिनांक २२ जुलै, २०२१ रोजीच्या सुधारित निकालामुळे अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना उत्तरपत्रिकेतील गुणांची फेरपडताळणी करावयाची असल्यास गुणपत्रके त्यांच्या Profile मध्ये उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील.

**ठिकाण- मुंबई**

**उपसचिव, परीक्षा-२**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**